IJRSSIS, Issue (VIII), Vol. I, Sep. 2021: 72-74
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# ख्यालगायनाच्या मांडणीतील सौंदर्यतत्वांचा विचार

**प्रा.डॉ. थाडेश्वर सं. मदनकर**
सहाय्यक प्राध्यापक (संगीत विभाग)
सेवादल महिला महाविद्यालय,नागपूर.
*Corresponding Author: tmadankar9@gmail.com

Communicated : 03.08.2021 | Revision :14.08.2021 Accepted : 29.08.2021 | Published: 01.09.2021

**सरांश :**

संगीत ही एक विश्वव्यापक सार्वभौमिक कला आहे. आरंभापासूनच मानवाने संगीत कलेद्वारा आपल्या व्यस्त जीवनशैलीतून संगीत गायनाद्वारे ख्याल गायनातून सौंदर्यात्मक रसानुभूतीच्या दर्शनाने आनंद लहरीतून संगीताचा सुखावह ठेवा घेतलेला आहे. पाश्चात्य तथा भारतीय तज्ञांच्या मतानुसार सौंदर्यशास्त्राच्या अनेक प्रकारांपैकी ज्यामध्ये समानता, विविधता, वैचित्रता, चमत्कारिता, सुव्यवस्था इत्यादीतून रसानुभूतीचे ख्यालगायनात सौंदर्यात्मक चमत्कारीक दर्शन घडून येते. भारतीय संगीताची मैफल ही आजही ख्यालानेच सजलेली असून तेच रुप सर्वांना भावणारे, हवेहवेसे वाटते. ख्यालगायनातील मांडणीतील बारकावे आपल्या लक्षात आल्यावर ख्यालगायनातील मांडणीतील काही सुरस व रुचिर घटकांचा विचार ख्यालगायक सौंदर्यात्मकदृष्ट्या करित असतो. ख्यालातील बंदिशांची सम तर थेट तार षडजावरच गाठावी लागते व यासाठी गायकाची रियाजी वृत्ती तसेच गायकाचा आवाज भारदस्त व कमावलेला असला पाहिजे व तेव्हाच ख्यालगायन करतांनी गायक ख्यालात रागाची सुयोग्य मांडणी करून सौंदर्यतत्वाचा विचार करीत असतो.

**बिजशब्द**:ख्यालगायन व ख्यालाचा आविष्कार, ख्यालगायन आणि मांडणी, विचार , ख्यालाचे उच्चार व सादरीकरण याची विशेषत:, ख्यालगायनातील सौंदर्य आणि रसनिष्पत्ती

## प्रस्तावना–

उत्तर हिंदुस्थानी अभिजात संगीतातील एक लोकप्रिय आणि विकसित स्वरुपाचा गायनप्रकार 'ख्याल' याचा मुळ अर्थ 'कल्पना' ख्याल हा धृपदापासून विकसित झालेला गायनप्रकार आहे, हे स्थायी, अंतरा या धृपदाशी साधारण असलेल्या त्याच्या घटकांनी जसे कळून येते; तसेच त्याच्या स्वरालंकारांवरून आणि बंदिशीच्या अवयवांवरून दिसून येते. धृपदाची बांधणी ही अत्यंत निगडीत परंपरा कमालीची दृढ तीत स्वरचनांचे स्वतंत्ररित्या आविष्कार करण्याला अवसर कमी पडतो तेव्हा धृपदाच्या या जखडबंदपणाची प्रतिक्रिया म्हण्न ख्याल या गायन प्रकाराने मुळ धरले असावे. गीतात येणाऱ्या विषयांच्याही दृष्टीने धृपदगीते ही साधारणपणे एकसाची होती.

## ख्यालगायन व ख्यालाचा आविष्कार

ख्यालगायनाने उलटपक्षी ख्यालाचा संगीतात्मक आशय धृपदाप्रमाणे केवळ बुद्धीप्रधान नसून कल्पनाप्रधानही असतो. रागाचे सर्वसंमत नियम वगळले तर ख्यालाचे इतर नियम त्यात धृपदा इतके जखडबंद नाहीत. ख्यालात शब्दानुसार शब्दावाचुनही स्वरविस्ताराला मुक्त वाव आहे. त्यात मुरकी, हरकती, कंप, गमके गिरकडी इ. छोट्या छोट्या शोभादायक स्वरालंकारांना चांगला अवसर असतो आणि याच विविधतेमुळे किंवा याच विचारामुळे ख्याल हा स्वाभाविकच अधिक रंजक ठरत असतो. भक्तिवीर शृंगारादी अनेक रसांचे विषय त्यात सामावू शकतात. प्रसंगोचित्त वर्णनाने राजगौरवासारखे इतरही लहान लहान विषय येवू शकतात. ख्याल हा प्रमुखता कल्पनाप्रधान, आविष्कारात अलंकार प्रचुर आणि आवाहनांच्या दृष्टीने भावपूर्ण असतो. ख्यालाची उत्पत्ती कव्वालीपासून झाली असे म्हटले जाते. कव्वाली

म्हणजे मुसलमानांचे भजन. कव्वाल्यांचा पहिला प्रवर्तक अमीर खुसरो मानण्यात येतो. परंतु नंतर जौनपुरचा शेवटचा सुलतान हुसेनशहा शर्की यांनी त्यांच्या काही प्रचलित असलेल्या 'पचडा' नावाच्या लोकगीतात्मक स्त्रीगीतांचा एक वेगळा आविष्कार करून त्यावर ख्यालाच्या चिजांची उभारणी केली आणि त्यांना पृथगात्मकरित्या योग्य काव्यनिर्मिती करून त्यावर असंख्य शेकडो ख्याल, चीजा रचून त्यांचा पद्धतशीर प्रचार व प्रसार करण्याचे कार्य पुढे अठराव्या शतकाच्या मध्यास सदारंग–अदारंगानी केले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ग्वाल्हेरचे बडे महमंद खाँ यांनी त्यात पेचदार तानेची भर घालून ख्यालाचे विकसित स्वरूप पक्के केले. नंतर धृपदाच्या तुलनेने द्रुत असलेली लयही त्यात दाखल झाली. पारंपारिकदृष्ट्या पाहता ख्यालाच्या विकासाचा इतिहास अशाप्रकारे आरंभीपासून सातशे वर्ष पसरलेला आहे, असे म्हणता येईल. ख्यालाच्या या इतिहासावरून असे दिसून येईल की ख्याल प्रकाराच्या निर्मितीच्या वेळी धृपद व ख्याल यांच्या सीमारेषा एकमेकीत बऱ्याच मिसळलेल्या होत्या.

ख्यालात प्रामुख्याने दोनच अंगे दिसून येतात. एक 'स्थायी' व दुसरा 'अंतरा.' आज ख्यालातील शब्दाच्या गौणत्वामुळे ख्याल गायन हे जवळजवळ तंतुवादनाच्या जागी आलेले दिसून येते. तसेच ख्यालाच्या लालित्यपूर्ण शैलीमुळे व छोट्या अलंकारांमुळे त्यावर ठुमरीचीही छाया पडलेली जाणवते. अशाप्रकारे कव्वालीपासून विकास पावता पावता ख्यालाच्या बांधणीत, पाटात व आकारात जो बदल झाला, जी भर पडली, धृपदामधून ख्यालाकडे जो भाग आला. त्या सर्वांचा जो एक भाग बनला आणि तो श्रोत्यांना रुजून अतिशय लोकप्रिय झाला.

**ख्यालगायन आणि मांडणी, विचार**

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात ख्यालगायनाइतकी लोकप्रियता दुसऱ्या कुठल्याही गायनप्रकाराला लाभली नाही. अनेक शतकांपूर्वी उदयास आलेल्या या गायनशैलीने आजच्या श्रोत्यांवरही विलक्षण मोहीनी घातली आहे. त्यांना भरभरून आनंद दिला आहे. भारतीय संगीताची मैफल ही आजही ख्यालानेच सजलेली असून तेच ख्यालाचे रुप सर्वांना भावणारे, हवेहवेसे वाटणारे आहे. ख्यालगायन आणि त्याची मांडणी किंवा विस्तार हा एक चमत्कारपुर्ण नाविण्यमय वातावरण आणि आलौकीक आनंद व सुखावह असा अनुभव आहे.

ख्यालगायनात म्हणजेच रागगायनात ख्याल मांडतांना गायक एखाद्या बंदिशीचा किंवा चीजेचा आधार घेऊन रागाची स्प व स्वच्छ प्रतिमा श्रोत्यांपुढे मांडणी करत असतो. स्थायी व अंतरा अशा दोन भागातील ही बंदिश ज्या तालचक्रामध्ये बांधलेली असते त्या तालाचे विशिष्ट वजन लक्षात घेऊन तो गायक अगदी मुक्तहस्तपणे अगदी तालाच्या अनुषंगाने ती चीज सादर करतो. अर्थात यामध्ये तबलावादकाचा सहभागही गायकाइतकाच मोलाचा ठरत असतो. ख्यालाच्या चीजेतील शब्द मोजकेच असल्यामुळे स्वरांचा भरणा करून राग आळवण्यास किंवा रागाची गायकी करून गायक स्वतः आपल्या कल्पनाचातुर्याची व समयसुचकतेची त्याला जोड देऊन त्या गायकाचे गायन अधिक रंगतदार होऊ लागते व श्रोतेही त्या सर्व गायनाचा आस्वाद घेतांना तल्लीन होऊन जातात.

**ख्यालाचे उच्चार व सादरीकरण याची विशेषतः**

कोणत्याही रागातील ख्यालाचे गायन अथवा सादरीकरण करतेवेळी ख्यालाची विशेषतः लक्षात घेता काव्याचे शब्द, त्यानुरूप त्याचा अर्थ व नंतर ख्यालातील बंदीशीचे सुरुवातीचे शब्द अगदी तोलुन, मापून अतिशय डौलदारपणे उच्चारून गायक त्यावर विविध प्रकारचे स्वरालाप आकर्षकपणे सादर करीत असतो. बंदिशीचे तोंड मुख किंवा मुखडा बंदिशीचा हा मुखडा गायकाला अधिक उठावदारपणे म्हणता यावा अशीच बंदिशीची रचना केलेली असते आणि त्यातही गायकाने आपली प्रगल्भता दाखवून योग्य आणि अर्थानुकुल शब्द योजून चिजेचे तोंड म्हणणे अपेक्षित असते. ख्यालातील बंदिशीचा मुखडा बंदिशीच्या अर्थाला न्याय देणारा व रागातील स्वरांच्या कोंदणात सहजपणे बसणारा हवा. अशा

मुखड्यावर रागगायनातील स्वरालाप आण्न सोडल्यास गायन अधिक चित्ताकर्षक व रसपुर्ण होते आणि मग त्या ख्यालगायनाची मजाच काही निराळी आणि रसपुर्ण अशी असते. ख्याल गायनात रसपुर्ण निर्मितीचे गायन करून प्रगल्भ आणि गोड गायनाचे सादरीकरण करावे. ही समज आणि उपज असावी.

**ख्यालगायनातील सौंदर्य आणि रसनिष्पत्ती**

कोणत्याही बंदिशीचा मुखडा हा आकर्षक, उबदार आणि मनमोहक असला की कुशल गायक हा त्यातून एक मोहक स्वरशिल्प उभारू शकतो. पण त्यासाठी गायकही रियाजी हवा. असा उत्ड्रष्ठ गायक आपल्या प्रतिभा विलासाने तालमात्रांशी अगदी सुयोग्य समन्वय साधुन लयकारीचे अनेक प्रकार दाखवून जेव्हा आकर्षक पद्धतीने समेवर येतो तेव्हा जाणकार श्रोते अगदी हर्षोल्लासित होतात. समेवर येतांनी गायक स्वरांशी विविध प्रकारची क्रिया करीत असतो. कधी स्वरालाप करतांना अलगदपणे मुखड्याशी येवून सहजपणे समेवर येत असतो. कधी अतिशय लडीवारपणे समेवर येतांना आलाप अर्धावट सोडून श्रोत्यांना आश्चर्यचकित करीत असतो. याऊलट कधी अतिशय आक्रमकपणे समेवर येतांनी स्वरांशी व लयतालाशी अतिशय बांधिलकीने ख्यालगायन सादर करीत असतो. कधी कधी ख्यालाच्या मुखड्याची तिहाई घेऊन सुंदर, मनमोहक गायकीचे सादरीकरण गायकाद्वारे केले जाते. रियाजी आणि प्रतिभाशाली गायक अशा नानाविध युक्त्या वापरून रसिकांचे चित्त आपल्या गायनकलेशी खिळवून ठेवू शकतो. गायकाने सादर केलेले ख्याल गायनाचे सौंदर्यीकरण हे एक अपार वैभव ग्रहण करण्याची एक जाणकार, मर्मज्ञ व रसिक श्रोता म्हण्न आपली कुवत असेल तर कलेच्या अशा प्रदर्शनाने आपल्याही रोमारोमात आनंदलहरी खेळू लागतात. हे सामर्थ्य त्या आनंदनिधान अशा संगीतकलेचे आहे. तसेच गायकाच्या प्रतिभा सामर्थ्याचेहि आहे. कलावंत व श्रोते यांची अशी एकरूपता साधली की त्यातून नादब्रह्माचा व अद्भुत शक्तीचा प्रत्यय येतो आणि हेच या महान संगीत कलेच्या रसग्रहणाचे खरे मर्म आहे हे इथे सिद्ध होते.

**निष्कर्ष :**

1) हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात ख्यालगायनाइतकी लोकप्रियता दुसऱ्या कुठल्याही गायनप्रकाराला लाभली नाही हे दिसून येते.
2) ख्यालगायन करतांनी स्वर, ताल, लय इत्यादीचा समन्वय साधून ख्यालगायनात अधिक सौंदर्यात्मक मांडणीचा विचार प्रगट होतो.
3) रागगायनात ख्याल गातांनी बंदिशीच्या आधारावरून रागाची स्पता व रागाचे नियम सां ळून रागगायनातील सौंदर्य व मांडणी यांचा समन्वय झालेला निष्कर्षास येतो.
4) ख्यालातील बंदिशीचे मुखडे मध्य सप्तकातून अगदी तार षडजावर संपवले जातात आणि बंदिशीची ही सौंदर्यात्मक मांडणी व रचना अत्यंत आकर्षक व कर्णमधुर दिसून येते.
5) प्रतिभाशाली रियाजी गुणसंपन्न गायक स्वतःच्या प्रतिभेने ख्यालगायनात नवीन आविष्कार करून ख्यालाची मांडणी करून त्याच्या कलेच्या विचाराने, श्रोत्यांमध्ये आनंदि वातावरण निर्माण करतांनी दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथसुची :**

1) रागदारी संगीतातील सौंदर्यस्थळे – रोचना भडकमकर
2) संगीत निबन्धमाला – पं. जगदीश नारायण पाठक
3) संगीत विशारद – वसंत